# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | **बाजरी : एबीपीसी-४-३** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | २००९ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | मध्यम ते हलकी जमीन |
| ५ | हवामान | खरीप व उन्हाळी हंगामात |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | जोडओळीवर ४५ X १५ सेंमी / पेरणीयोग्य पाऊस पडल्यानंतर जुलैच्या पहिल्या पंधरवाडयापर्यंत व उन्हाळयात जानेवारीच्या दुस□या पंधरवाडयापासून फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाडयापर्यंत |
| ७ | प्रती एकर बियाणे | १ ते १.५ किलो |
| ८ | पीक व्यवस्थापन | |
| | १ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | खोल नांगरणी करून वखराच्या दोन पाळया देवून जमीन सपाट, भुसभुशीत करून २ सेंमी खोलीवर बियाणाची पेरणी करावी, जास्त खोलीवर पेरणी करु नये |
| | २ खत व्यवस्थापन | ७ गाडया शेणखत प्रती हेक्टरी टाकावे, पेरणीवेळी नत्र, स्फुरद व पालाश अनुक्रमे ३०:३०:३० किग्रॅ/हे. प्रमाणे टाकावे व पेरणी नंतर १ महिन्यानी नत्र ३० किग्रॅ प्रती हेक्टरी देण्यात यावे. |
| | ३ पाणी व्यवस्थापन | ३ ते ४ आठवडे पावसाचा ताण पडल्यास संरक्षित पाणी दयावे. संरक्षित पाणी पिकाच्या वाढीच्या अवस्थेत, फुटव्याच्या अवस्थेत व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी दयावे. |
| | ४ कीड व्यवस्थापन | बाजरीवर **हिंगे अथवा भुंगे, सिटोनिड** भुंग्यासाठी सदरील भुंगे जमा करून रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नाश करावा, प्रकाय सापळयाचा उपयोग करावा, मोसमी पाऊस सुरू होण्यापूर्वी शेताची व बांधाची स्वच्छता करून मिथील पॅराथिऑन २ टक्के भुकटी अथवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी २० किग्रॅ / हेक्टरी धुरळणी करावी. **खोडकीडीसाठी** कीड लागलेले पोंगे वेळोवेळी काढून जाळून टाकावीत, प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर एन्डोसल्फान ३५ टक्के प्रवाही ३०० मिली पाण्यात अथवा एन्डोस्ल्फान ४ टक्के दाणेदार प्रती हेक्टरी पोंग्यात टाकावे. पहिली उपयायोजना उगवणीनंतर २५ दिवसांनी करावी, **केसाळ अळी चा** प्रादुर्भाव दिसून आल्यास कणसावर एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी २० किग्रॅ/ हेक्टरी धुरळावी. |
| | ५ रोग व्यवस्थापन | **केवडा/ गोसावी** : या रोगाचे प्रतीकारक वाण वापरल्यास आणि वाढ व पिकाची फेरपालट केल्यास या रोगापासून बचाव होतो. तरीपण रासायनिक नियंत्रणासाठी ॲप्रॉन ३५ टक्के प्रवाही @ बिजप्रक्रिया करूनच पेरणी करावी. **अरगट/ कणसावरील चिकटा** : या रोगाच्या प्रतीबंधासाठी २० टक्के मिठाच्या द्रावणात बियाणे टाकून तरंगणारे बी काढून नाश करावे व तळाशी राहिलेले बी पेरण्यास वापरावे, कणीस निसत असताना बावीस्टीन ०.१ टक्के बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| ९ | पिकाचा कालावधी | ८० ते ८५ दिवस |

| | | |
|---|---|---|
| **१०** | **उत्पादकता** | धान्य : २५ ते ३० क्विंटल<br>कडबा : ५० ते ५५ क्विंटल |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. हा वाण गोसावी रोगास प्रतीकारक आहे.<br>२. दाण्याचा आकार मध्यम व रंग हलका हिरवट असून फुटव्याचे प्रमाण जास्त असून १००० दाण्याचे वजन १२ ते १५ ग्रॅम आहे.<br>३. हा सरळ वाण खरीप व उन्हाळी हंगामास उत्तम आहे. |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |